# संजीवनी हसबनीस



www.naaddwayee.com





# परिचय

संजीवनी हसबनीस या भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रातील मोजक्या नामवंत महिला तालवादकांपैकी एक आहेत. भारताच्या समृद्ध संगीत परंपरेचे जतन व प्रसार यासाठी त्या अत्यंत तळमळीने कार्यरत असून गायन व तबला या दोन्ही कलाक्षेत्रात त्यांचे काम सुरू आहे .

सांगली या संगीत परंपरांनी नटलेल्या महाराष्ट्रातील शहरात जन्मलेल्या संजीवनी यांचे बालपण सुर-लयीने भारलेल्या वातावरणात गेले. त्यांच्या पालकांनी त्यांच्या अंगभूत कलागुणांना ओळखून संगीताच्या वाटेवर मार्गस्थ होण्यासाठी प्रोत्साहित केले.

त्यांचे तबल्याचे शिक्षण फरूखाबाद-लखनौ घराण्याचे ज्येष्ठ तबलावादक पं. गणपतराव कवठेकर तसेच पं. कवठेकर यांचे ज्येष्ठ शिष्य श्री. कल्याण देशपांडे यांच्याकडे झाले. पं. कवठेकर हे उस्ताद मुनीर खांसाहेब व उस्ताद जहांगीर खांसाहेब यांचे शिष्य होते.



संजीवनी यांनी पं. सुरेश (भाई) गायतोंडे यांच्याकडे तबल्याचे पुढील शिक्षण घेतले आणि पद्मश्री तालयोगी पं. सुरेश तळवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली आपली कला अधिक विकसित केली. सध्या त्या भारतातील नामवंत तबलावादक डॉ. अनीश प्रधान यांच्याकडे नियमित तालीम घेत आहेत.

अनेक नामवंत स्पर्धांमध्ये विजेती ठरलेल्या संजीवनी यांना सुप्रसिद्ध संगीताचार्य पं. द. वि. काणेबुवा यांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रीय गायनाचे शिक्षण मिळाले. त्यांच्या निधनानंतर पं. नारायण बोडस यांच्याकडे त्यांनी शिक्षण घेतले. गायन व तबला वादन या दोन्ही क्षेत्रांतील त्यांच्या वाटचालीमुळे त्या एक विशेष कलाकार म्हणून रसिकांमध्ये ओळखल्या जातात. मराठी संगीत नाटक ‘संगीत शारदा’ मधील त्यांच्या प्रमुख भूमिकेसाठी त्यांना महाराष्ट्र रंगायन, नवी दिल्ली यांच्याकडून ‘सर्वोत्तम गायिका-अभिनेत्री’ हा विशेष पुरस्कार प्राप्त आहे.

एक तबलावादक म्हणून त्यांना प्राप्त झालेला ‘उस्ताद थिरकवा बाज’ हा मानाचा पुरस्कार घराणेदार तबला वादनातील त्यांचे प्राविण्य व कलेप्रती असलेल्या त्यांच्या निष्ठेचे द्योतक आहे.

## काही उल्लेखनीय प्रस्तुती

- सवाई गंधर्व संगीत महोत्सव, पुणे
- नेहरू सेंटर, मुम्बई
- पं. राम मराठे स्मृती महोत्सव, ठाणे
- बंगलोर इंटरनॅशनल  सेंटर
- खयाल ट्रस्ट, मुम्बई
- दादर माटुंगा सांस्कृतिक संघ, मुम्बई
- आर्ट सर्कल बेळगावी
- संगीत सभा, उडुपी
- ह्रिदयेश आर्ट्स, मुम्बई
- कोमल निषाद, बडोदा

## निवडक प्रस्तुती लिंक्स

मणिपाल सांस्कृतिक संघ - तबला सोलो

सुरंजन ट्रस्ट - तबला सोलो

साथ संगत - श्री. श्रीराम हसबनीस

सुगम संगीत गायन










Call: +91 9960611836

sanjeevanihasabnis@gmail.com

www.naaddwayee.com